दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS
RNI NO. MAHMAR/2023/84162
वर्ष २ रे | अंक ३१ वा | सोमवार १७ जून २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 31 | Date : 17/06/2024 blow Monday Page 4 Price 4



गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..
दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८


# ईव्हीएम ही एक स्वतंत्र प्रणाली

## निवडणूक अधिकाऱ्यांचा मोठा खुलासा

नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज

लोकसभा निवडणुकीच्या निकालाला दोन आठवडे झाले. मात्र, अद्यापही ठाकरे गटाचे अमोल किर्तीकर विरुद्ध शिंदे गटाचे रवींद्र वायकर यांच्यामधील निकालाचा मुद्दा चर्चेत आहे. शिवसेना शिंदे गटाचे मुंबई उत्तर पश्चिम मध्य लोकसभेचे उमेदवार रवींद्र वायकर यांचा विजय सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. रवींद्र वायकर यांनी अमोल किर्तीकर यांचा अवघ्या ४८ मतांनी पराभव केला. मात्र, यानंतर ठाकरे गटाकडून या मतमोजणीत गैरप्रकार झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. तसेच रवींद्र वायकर यांच्या एका नातेवाईकावर मतमोजणी केंद्रामध्ये मोबाईल नेल्याप्रकरणी गुन्हाही दाखल झालेला आहे.



या सर्व प्रकरणावर विरोधकांकडून सत्ताधाऱ्यावर आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. यानंतर अखेर आता मुंबई उत्तर पश्चिम मतदारसंघातील या मतमोजणीसंदर्भात निवडणूक निर्णय अधिकारी वंदना सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषद घेत स्पष्टीकरण दिलं आहे. ईव्हीएम हॅक करता येत नाही. ईव्हीएम मशीन ही पूर्णपणे स्वतंत्र प्रणाली असून तिला अनलॉक करण्यासाठी कोणतीही ओटीपी लागत नाही. त्यामुळे ईव्हीएम मशीन हॅक करता येत नाही, असं स्पष्टीकरण। पान २ वर

**'त्या माणसावर तक्रार दाखल'**

ओटीपी हा लॉगिन करण्यासाठी वापरला जातो. डेटा एन्ट्रीसाठी पासवर्ड लागतो. त्याचा ईव्हीएमशी काहीच संबंध नाही. आमच्या डेटा ऑपरेटरचा मोबाईल दुसरीकडे सापडला त्यामुळे हा गोंधळ झालाय. आम्ही संबंधित कर्मचाऱ्याला डीसमिस केलं आहे. त्याने मोबाईल द्यायला नव्हता. मोबाईलचा वापर अनधिकृत होता. त्या माणसावर तक्रार दाखल झाली आहे. मतमोजणीचा या गोष्टीशी काहीच संबंध नाही, असं स्पष्टीकरण निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी केलं.

# शून्य दहशतवाद, वर्चस्वासाठी नियोजन करा

## जम्मूतील धोरणांबाबत केंद्रीय गृहमंत्र्यांच्या सक्त सूचना

नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज

काश्मीरमध्ये अवलंबिण्यात आलेले क्षेत्रीय वर्चस्व आणि शून्य दहशतवाद धोरण जम्मू विभागातही काटेकोरपणे राबविण्यात यावे, अशी सूचना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी अधिकाऱ्यांना दिली. नवी दिल्लीमध्ये जम्मू-काश्मीरमधील सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी झालेल्या बैठकीत त्यांनी दहशतवादाचा बीमोड करण्यासाठी मोदी सरकार कटिबद्ध असल्याचेही सांगितले.

गेल्या काही दिवसांत जम्मू-काश्मीरमध्ये अतिरेकी कारवायांमध्ये वाढ झाली आहे. तुलनेने शांत असलेल्या रियासी जिल्ह्यात गोळीबारानंतर वैष्णोदेवी यात्रेकरूंची बस दरीत कोसळून अपघात झाला होता. त्यानंतर तीन दिवसांपूर्वी पंतप्रधान




नरेंद्र मोदी यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेऊन दहशतवादाचा बीमोड करण्यासाठी सर्वप्रकारचे उपाय योजण्याचे आदेश दिले. रविवारी शहा यांनी घेतलेल्या बैठकीत प्रामुख्याने जम्मू विभागाच्या सुरक्षेचा आढावा घेण्यात आला. संपूर्ण राज्यात दहशतवादाचा बीमोड करायचा असेल, तर काश्मीरप्रमाणेच जम्मूमध्येही योजनांची अंमलबजावणी झाली पाहिजे, असे शहा यांनी यावेळी नमूद केले. २९ तारखेपासून सुरू होणाऱ्या अमरनाथ यात्रेच्या सुरक्षेचा आढावाही यावेळी घेण्यात आला। पान २ वर

# पुतळ्यांचे एकाच जागी स्थलांतर; मावळते लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांचे स्पष्टीकरण

नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज

नव्या संसद भवनाच्या आवारातील राष्ट्रीय नेते, स्वातंत्र्यसैनिक यांचे पुतळे हटविण्यात आले नसून त्यांचे एकाच ठिकाणी स्थलांतर करण्यात आले आहे. हा निर्णय एकतर्फी घेतला नसून संबंधितांशी चर्चा करण्यात आली होती, असे मत मावळत्या लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी रविवारी व्यक्त केले.

राष्ट्रीय नेत्यांचे पुतळे ज्या ठिकाणी ठेवण्यात आले आहे, त्या 'प्रेरणास्थळा'चे उद्घाटन रविवारी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते झाले. तत्पूर्वी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी पत्रकारांना पुतळे एकत्र ठेवण्याचा निर्णय का घेतला याविषयी माहिती दिली. लोकसभा सचिवालयाने हा निर्णय घेतला होता. मात्र हा निर्णय योग्य असल्याचे बिर्ला यांनी सांगितले. राष्ट्रीय नेते व स्वातंत्र्यसैनिकांचे हे पुतळे वेगवेगळ्या ठिकाणी असल्याने अभ्यागतांना ते योग्यरीत्या पाहणे कठीण झाले होते. मात्र एकाच ठिकाणी ते असल्याने त्यातून अभ्यागतांना प्रेरणा मिळेल, असे बिर्ला यांनी सांगितले.

पुतळे स्थलांतराचा निर्णय लोकसभा सचिवालयाने घेतला असून त्याचा सरकारशी काहीही संबंध नाही. विविध ठिकाणी असलेले पुतळे किंवा प्रतिमा सर्वांना पाहता येत नाही किंवा त्यांची योग्य पद्धतीने देखभालही करता येत नाही. जर हे सर्व पुतळे एका ठिकाणी ठेवले तर संसदेला भेट देणाऱ्यांना ते एकाच ठिकाणी पाहता येतील, त्याविषयी जाणून घेता येईल, असा विचार मनात आल्यानंतर त्याबाबत संबंधितांशी चर्चा करण्यात आली आणि त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला, असे बिर्ला यांनी सांगितले. पुतळे एकाच ठिकाणी असल्याने राष्ट्रीय नेत्यांच्या जीवनाची आणि कर्तृत्वाची माहिती अधिक चांगल्या प्रकारे प्रसारित होण्यास मदत होईल, असे बिर्ला म्हणाले.नव्या संसदेच्या 'गज द्वार'तून पंतप्रधान संसदभवनामध्ये प्रवेश करतात. त्यांचा मार्ग प्रशस्त करण्यासाठी या द्वारासमोरील संपूर्ण जागेचे सुशोभीकरण केले जात आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, महात्मा



गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बिरसा मुंडा, महाराणा प्रताप अशा अनेक महापुरुषांचे पुतळे गेल्या आठवड्यात स्थलांतरित करण्यात आले.

संसदेच्या आवारातील पुतळे स्थलांतरित करण्याचा निर्णय सत्ताधारी सरकारने एकतर्फी घेतला असल्याचा दावा काँग्रेसने रविवारी केला. ज्या ठिकाणी संसदेची प्रत्यक्ष बैठक होते, त्या बाजूला महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे नसावेत हा एकमेव उद्देश त्यांचा होता. लोकसभेच्या संकेतस्थळानुसार चित्र व पुतळ्यांवरील संसदेच्या समितीची अखेरची बैठक १८ डिसेंबर २०१८ रोजी झाली. १७ व्या लोकसभेत त्याबाबत एकही बैठक झाली नसताना हा निर्णय कधी घेतला, असा सवाल काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी विचारला.

# सिक्कीमच्या लॅच्युन्ग व्हॅलीत अडकलेल्या राज्यातील पर्यटकांना शासनाकडून तातडीची मदत

मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज

सिक्कीम येथील लॅच्युन्ग व्हॅली येथे पडलेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्यावर दरड कोसळल्याने अनेक राज्यातील पर्यटक तिथे अडकले आहेत. यात महाराष्ट्रातील काही पर्यटकांचाही समावेश आहे. ही बातमी आज सकाळी समजल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तत्काळ त्याची दखल घेऊन राज्यातील पर्यटकांना सुखरूप परत आणण्याचे निर्देश राज्य प्रशासनाला दिले. त्यामुळे आता उद्या या सर्व पर्यटकांना वायुदलाच्या विशेष हेलिकॉप्टरने गंगटोक येथे सुरक्षितस्थळी हलवण्यात येणार आहे.

सिक्कीम येथे झालेला मुसळधार पाऊस आणि त्यामुळे तेथील स्थानिक जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. ही बातमी मुख्यमंत्र्यांना माध्यमांद्वारे समजली. त्यानंतर त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना संपर्क साधून अडकलेल्या सर्व पर्यटकांना राज्य शासनामार्फत सर्वतोपरी मदत मिळवून देण्याचे निर्देश दिले. एवढ्यावरच न थांबता त्यांनी स्वतः सिक्कीम सरकारमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून राज्यातील। पान २ वर



# टेंभुर्णीजवळ अनोळखी तरुणाच्या हत्येचा उलगडा; तेलंगणातील आई व बहिणीने मारेकऱ्यांना दिली होती सुपारी

टेंभुर्णी/दैनिक यशसिध्दि न्यूज

सोलापूर-पुणे महामार्गावर टेंभुर्णीजवळ कोणताही पुरावा मागे न ठेवता खून करून मोकळ्या जागेत टाकून दिलेल्या मृतदेहाची ओळख पटवून पोलिसांनी या गुन्हाचा बारकाईने तपास केला असता मृत तरुण दारू पिऊन त्रास देतो म्हणून वैतागून तेलंगणातील जन्मदात्या वृद्ध आई आणि बहिणीनेच त्याच्या हत्येची सुपारी दिली होती, असे निष्पन्न झाले. आई व बहिणीसह हत्येची सुपारी घेणाऱ्या तिघाजणांना सोलापूर ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे.




सुकुमार व्यंकटरमणा तोराडी ऊर्फ गोडूरेचला (वय ३५) असे खून झालेल्या तरुणाचे नाव असून या गुन्ह्यात त्याची जन्मदाती आई अन्नपूर्णा (वय ६०, रा. सदाशिवपेठ, जि. मेडक, तेलंगणा), बहीण विनयारूणा राजेंद्र चौधरी (वय ४०, रा. शेरलिंगमपल्ली, जि. रंगारेड्डी, तेलंगणा) यांच्यासह हत्येची सुपारी घेतलेल्या मोहम्मद अकबर खान व त्याचे साथीदार मुनीरअली शब्बीरअली सय्यद आणि महिबूब अब्दुल वाहीद (रा. तेलंगणा) यांना अटक करण्यात आली आहे.

गेल्या २६ मे रोजी टेंभुर्णीजवळ एका मोकळ्या जागेत अनोळखी तरुणाचा मृतदेह खून करून टाकलेल्या अवस्थेत आढळून आला होता. पोलिसांनी घटनास्थळाचे निरीक्षण केले असता तेथे मोटारकारच्या टायरच्या। पान २ वर

## कै.सौ.रुपाली इंगळे यांची बुधवार दि.१९ जून रोजी दशक्रिया विधी

अक्कलकोट/प्रतिनिधी: येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक महेश इंगळे यांच्या सुविद्य पत्नी कै.सौ.रुपाली इंगळे यांचे सोमवार



दि. १० जून रोजी सायंकाळी ४:३० वाजता दीर्घ आजाराने पुण्यातील जहांगीर रुग्णालयात दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवार दिनांक ११/६/२०२४ रोजी सकाळी ९ वाजता अक्कलकोट येथील हिंदू स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती लाभावी याकरिता बुधवार दिनांक १९ जून रोजी सकाळी ८ वाजता आनंदबाग (थडगे मळा) अक्कलकोट येथे त्यांची दशक्रिया विधी होणार आहे.

# केंद्रीय राज्यमंत्री पदाची हॅटट्रिक केल्यानंतर मुंबई रामदास आठवले यांचे भव्य स्वागत

मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारीता राज्यमंत्री ना.रामदास आठवले हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या केंद्रीय मंत्रिमंडळात सलग तीन वेळा केंद्रीय राज्यमंत्री पद भूषवत आहेत.तिसऱ्यांदा केंद्रीय राज्यमंत्री पद मिळाल्यानंतर ना.रामदास आठवले यांचे आज प्रथमच दिल्लीतून मुंबईत आगमन झाले.त्यावेळी मुंबई प्रदेश रिपब्लिकन पक्षातर्फे केंद्रीय राज्य मंत्री पदाची हॅटट्रिक करणाऱ्या आपल्या लाडक्या नेत्याच्या स्वागत सत्कारासाठी रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी मुंबई विमानतळावर प्रचंड गर्दी केली होती.मुंबई विमानतळ टर्मिनल १ येथे ना.रामदास आठवले यांची रिपाइं कार्यकर्त्यांनी भव्य रथातून मिरवणूक

### चैत्यभूमी येथे फादर्स डे चे औचित्य साधत महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवलेंनी केले विनम्र अभिवादन

काढून वाजत गाजत आनंद उत्सव साजरा करण्यात आला.त्यानंतर ना.रामदास आठवले थेट चैत्यभूमी येथे रवाना झाले.चैत्यभूमी येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना ना.रामदास आठवले यांनी विनम्र अभिवादन केले आज फादर्स डे चा ही योग जुळून आला होता.कार्यकर्त्यापासून मंत्रीपदा पर्यंत जे आहे ते सर्व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांमुळे आम्हाला लाभले असल्याची कृतज्ञ भावना ना.रामदास आठवलेंनी व्यक्त केली.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष देशभर पोहोचवण्याचे काम आम्ही करत आहोत असे ना.रामदास आठवले यावेळी म्हणाले.

यावेळी ना.रामदास आठवलेंवर रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी जेसीबी तून पुष्प वर्षाव केला.मोठ्या प्रमाणात ना.रामदास आठवले यांचे पुष्पहार पुष्पगुच्छ मिठाई देऊन अभिनंदन करण्यात आले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात एन डी ए ला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. त्यामुळे विरोधकांचे आरोप चुकीचे आहेत. यूपीए च्या



काळात जे आघाडी सरकार होते त्यास भाजप ने कधीही अल्पमतातील सरकार असा आरोप केला नव्हता. मोदींच्या नेतृत्वातील एन डी ए सरकार हे पूर्ण बहुमताचे सरकार आहे. आम्ही गरीब झोपडीवासी दलित बहुजन सर्व वर्गाची मी केंद्रीय राज्य मंत्री म्हणून सेवा करीन माझी जबाबदारी चांगली पार पाडीन असे मत ना. रामदास आठवले यांनी व्यक्त केले.यावेळी सौ सीमाताई आठवले; कुमार जित आठवले ; रिपाइं चे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर; महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजाभाऊ सरवदे;। पान २ वर

# संपादकीय

## चुकी कुणाची..

देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचा 'नीट' (राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षा) परीक्षेवरील विश्वास उडाला आहे. पेपरफुटी आणि अन्य गैरप्रकारामुळे नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) ही संस्था वादात सापडली आहे. एमबीबीएस, बीडीएस आणि बीएएमएस या वैद्यकीय अभ्यासक्रमातील प्रवेशासाठी नीट परीक्षा देणे बंधनकारक आहे. बारावीच्या परीक्षेत मिळणाऱ्या गुणांपेक्षा नीट परीक्षेतील गुणांवरच विद्यार्थ्यांना वैद्यकीय अभ्यासक्रमाला प्रवेश मिळतो. गेल्या काही वर्षांपासून केंद्र सरकारने नीट परीक्षेची अंमलबजावणी केली आहे. ही परीक्षा राष्ट्रीय स्तरावरील एनटीए या संस्थेमार्फत घेतली जाते. वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या देशभरातील सुमारे एक लाख जागांसाठी २३ लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी यंदा परीक्षा दिली होती. या परीक्षेसाठी विद्यार्थी दिवस-रात्र मेहनत घेतात. कोचिंग क्लासेससाठी लाखो रुपये मोजतात. या परीक्षेची तयारी करण्यासाठी विद्यार्थी आपले घरदार सोडून मेट्रो पोलिटिन सिटी गाठतात. खासगी शिकवणी घेणाऱ्यांकडून वर्षभरात या विद्यार्थ्यांकडून अनेक चाचणी परीक्षा घेतल्या जातात. त्यातून काही विद्यार्थी यशस्वी होतात, तर अपेक्षित यश मिळत नसल्याने काही विद्यार्थ्यांनी निराशेतून जीवन संपवल्याच्या घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे ही नीट परीक्षा विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवणारी असल्याने याकडे देशाचे लक्ष वेधलेले असते. नीटची अंमलबजावणी झाल्याच्या तीन-चार वर्षांमध्ये निकालासंदर्भात कोणाच्याही तक्रारी नव्हत्या. अत्यंत सूक्ष्मरीत्या ही परीक्षा घेतली गेली. मात्र, यंदा पेपर फुटल्याच्या आणि अन्य गैरप्रकाराने नीटच्या विश्वासार्हतेलाच धक्का बसला. हरियाणातील एकाच केंद्रात परीक्षा दिलेल्या सहा-सात विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळाले. तसेच अन्य ठिकाणी ७२० पैकी ७२० गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ६७ इतकी आहे. या परीक्षा पध्दतीतून वैद्यकीय प्रवेशासाठी पात्र ठरणाऱ्यांची संख्या गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा दोन लाखांनी वाढल्याने नॅशनल टेस्टिंग एजन्सीवर शंका उपस्थित होणे स्वाभाविक आहे. गुणवत्ता असलेल्या आणि परिश्रम घेतलेल्या विद्यार्थ्यांवर नीटमधील गैरप्रकारामुळे अन्याय होऊ शकतो. त्यामुळे ही परीक्षा रद्द करण्यासाठी अनेक विद्यार्थी व पालकांनी दाखल केलेल्या याचिकेची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेऊन केंद्र सरकार आणि एनटीएला नोटीस बजावली आहे. याचिकेवरील पहिल्याच सुनावणीत खंडपीठाने नीटच्या पावित्र्याला व विश्वासार्हतेला धक्का बसल्याचा अभिप्राय नोंदवत सरकारकडून खुलासा मागवला आहे

# हार्मोनल असंतुलनामुळे हॉट फ्लॅशचे महिलांवर होतात अधिक परिणाम



हॉट फ्लॅशची समस्या सामान्यत: महिलांमध्ये रजोनिवृत्तीशी संबंधित असते, परंतु ही समस्या पुरुषांमध्येही दिसून येते. काही औषधे, उपचार किंवा इतर कारणांमुळे हार्मोनल असंतुलनामुळे स्त्रिया आणि पुरुष दोघांनाही अनेकदा हॉट फ्लॅशचा अनुभव येऊ शकतो. रजोनिवृत्तीच्या काळात स्त्रियांना अनेक प्रकारच्या समस्या येतात आणि अशीच एक मोठी समस्या म्हणजे 'हॉट फ्लॅश'.

हार्मोनल असंतुलन: हॉट फ्लॅश ही तर अशी स्थिती आहे, जिथे शरीरात अचानक उष्णतेची भावना, घाम येणे, अस्वस्थता आणि उन्हाळ्यात अनुभवलेले सर्व परिणाम तीव्र स्वरुपात दिसू लागतात. गरम फ्लॅशच्या स्थितीत, बऱ्याच वेळा एखादी व्यक्ती हिवाळ्याच्या हंगामातही खूप उबदार कपडे न घालता घामाने भिजते. स्त्रियांमध्ये, ही समस्या सामान्यत: पेरी-मेनोपॉजपासून रजोनिवृत्तीनंतरच्या कालावधीपर्यंत दिसून येते. स्त्रियांमध्ये रजोनिवृत्ती दरम्यान गरम चमकांच्या समस्येसाठी हार्मोनल असंतुलन जबाबदार असल्याचे मानले जाते. परंतु ही समस्या केवळ महिलांमध्येच नाही तर पुरुषांमध्येही वेगवेगळ्या कारणांमुळे हार्मोन्सच्या असंतुलनामुळे दिसून येते.

हॉट फ्लॅशचे परिणाम: स्त्रियांमध्ये रजोनिवृत्तीच्या काळात शरीरातील काही हार्मोन्स जसे की, एंडोक्राइन आणि इस्ट्रोजेनच्या पातळीत असंतुलन होते. त्यामुळे शरीराचे तापमान अचानक अनेक पटींनी वाढते आणि त्याच वेळी शरीरातील अति उष्णतेमुळे शरीराचे तापमान वाढते. हॉट फ्लॅशचे परिणाम देखील दिसून येतात, जसे की जास्त घाम येणे, अस्वस्थता, शरीरात कोरडेपणा इ. हार्मोन्सच्या असंतुलनामुळे, तणाव आणि इतर अनेक शारीरिक आणि वर्तणुकीशी संबंधित समस्या आणि बदल देखील या काळात स्त्रियांमध्ये दिसून येतात.

परिणाम महिलांवर अधिक दिसून येतो: मुंबईतील आयुर्वेदिक डॉक्टर मनीषा काळे सांगतात की, जेव्हा महिला आणि पुरुष दोघांमध्ये काही संप्रेरकांमध्ये, विशेषत: सेक्स हार्मोन्समध्ये असंतुलन होते तेव्हा शरीरात 'पित्त दोष'चे प्राबल्य असते तेव्हा 'वात दोष' देखील सुरू होतो. त्याचा परिणाम महिलांवर अधिक दिसून येतो. या अवस्थेत महिलांना काही वेळा अचानक शरीरात उष्णता वाढणे, गुदमरणे, अस्वस्थता आणि अस्वस्थता यासोबतच त्वचा कोरडी पडणे आणि योनीमार्गातही कोरडेपणा जाणवतो.

लक्षणे: कधीकधी हॉट फ्लॅशचा प्रभाव इतका तीव्र असू शकतो की, एअर कंडिशनिंग असलेल्या खोलीत किंवा पंख्यासमोर बसून देखील तुम्हाला खूप गरम वाटू शकते. ती स्पष्ट करते की हॉट फ्लॅशमध्ये, शरीराचा वरचा भाग जसे की चेहरा, मान, कान, छाती आणि इतर भाग जास्त गरम होतात आणि जास्त घाम येतो. याशिवाय बोटांना मुंग्या येणे, मळमळ सारखे वाटणे आणि हृदयाचे ठोके वाढणे ही लक्षणेही दिसून येतात.

# सोलापुरात स्मशानभूमीत पुरलेला बाळाचा मृतदेह तिसऱ्याच दिवशी गायब

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

शहरातील मोरे हिंदू स्मशानभूमीत दफन केलेला एका दहा महिन्यांच्या मुलाचा मृतदेह तिसऱ्याच दिवशी गायब झाल्यामुळे मृत बाळाच्या नातेवाईकांनी संताप व्यक्त करीत थेट पोलिसांत धाव घेतली. कोणी तरी अज्ञात व्यक्तींनी जादूटोण्यासाठी बाळाचा मृतदेह जमिनीतून उकरून नेला असावा, असा संशय व्यक्त होत असून पोलीस विविध पैलूंनी तपास करीत आहेत.

विजापूर नाका झोपडपट्टी क्रमांक २ मध्ये राहणारे राहुल वाघमारे यांचा अवघ्या दहा महिन्यांचा मुलगा प्रियांश यास घरात अचानकपणे झटके आल्यामुळे एका खासगी बाल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मेंदूला सूज आल्यामुळे उपचाराच्यावेळी गेल्या १४ जून रोजी बाळाचा मृत्यू झाला. त्याच दिवशी दुपारी मृत बाळाचा मृतदेह मोरे हिंदू स्मशानभूमीत पुरण्यात आला होता. त्यासाठी चार फूट खोल खड्डा खणण्यात आला होता. थडग्यावर मोठी फरशी ठेवण्यात आली होती. रविवारी तिसऱ्या दिवसाचा विधी उरकण्यासाठी बाळाचे नातेवाईक स्मशानभूमीत आले असता तेथे बाळाच्या थडग्यात मोठा खड्डा पडल्याचे आणि थडग्यातील बाळाचा मृतदेह गायब झाल्याचे दिसून आले.पोलिसांनी स्मशानभूमीत धाव घेऊन श्वानपथकाच्या मदतीने तपास केला. परंतु त्यातून हाती काही लागले नाही. मृतदेह जनावरांनी पळवून नेला असावा, असा कयासही व्यक्त होत आहे. मात्र नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार थडग्यासाठी खोदलेल्या खड्ड्यात बाळाचा मृतदेह दफन केला होता. थडगा उघडा पडल्यानंतर तेथे जवळच मृत बाळाच्या मृतदेहावर घातलेले कापड आढळून आले. आसपासच्या संपूर्ण परिसरात शोध घेतला असता मृतदेह किंवा त्याच्या शरीराचे कोणतेही अवशेष सापडले नाहीत. स्मशानभूमीत सुरक्षा व्यवस्थेचा अभाव आहे. तेथे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचीही व्यवस्था नाही. सोलापूर महापालिका प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे आपल्या चिमुकल्या लाडक्या बाळाचा पुरलेला मृतदेह गायब झाल्याचा आरोप बाळाचे वडील राहुल वाघमारे व आई मृणाली वाघमारे यांनी केला आहे.

## पान १ वरुन

### केंद्रीय राज्यमंत्री पदाची हॅटट्रिक..

राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे; मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; कार्याध्यक्ष बाळासाहेब गरूड; सरचिटणीस विवेक पवार; जिल्हा अध्यक्ष साधू कटके; रमेश गायकवाड; संजय डोळसे; प्रकाश जाधव; संजय पवार ;अजित रणदिवे ;सुरेश बार्शिंग ; दयाळ बहादुर; श्रीकांत भालेराव; कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष उत्तम दादा कांबळे; मंगल माळगे;सोलापूर चे जितेंद्र बनसोडे; प्रल्हाद जाधव; भास्कर वाघमारे;अभयाताई सोनवणे; उषाताई रामलु; मीनाताई वैराट; सोना कांबळे; अमित तांबे; सुमित वजाळे; रवी गायकवाड; साचीनभाई मोहिते; घनश्याम चिरणकर; कामु पवार; युवराज सावंत अरुण पाठारे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते

### ईव्हीएम ही एक स्वतंत्र प्रणाली..

निवडणूक निर्णय अधिकारी वंदना सूर्यवंशी यांनी दिलं आहे.

ईव्हीएम अनलॉक करण्यासाठी कोणत्याही ओटीपीची आवश्यकता नाही. ईव्हीएम अनलॉक करण्यासाठी कोणत्याही मोबाइल ओटीपीची आवश्यकता नाही. ईव्हीएम ही एक स्वतंत्र प्रणाली आहे. ईव्हीएम मशीन हॅक होऊ शकत नाही. तसेच जी तक्रार दाखल झालेली आहे, त्या मोबाईलचा या मतमोजणीशी काहीही संबंध नाही. या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. यासंदर्भात आम्ही पोलिसांत गुन्हा दाखल केला असून याबाबत अधिक तपास सुरू आहे, असं स्पष्टीकरण निवडणूक निर्णय अधिकारी वंदना सूर्यवंशी यांनी दिलं.

मोबाईलच्या ओटीपीचा आरोप होत आहे. त्यासंदर्भात बोलताना निवडणूक निर्णय अधिकारी वंदना सूर्यवंशी यांनी सांगितलं, जो गुन्हा दाखल झाला आहे. त्यामध्ये कोणत्याही मोबाईल ओटीपीचा उल्लेख नाही. ईव्हीएम मशीन ओपन करण्यासाठी कोणताही ओटीपी लागत नाही. यामध्ये मी निवडणूक अधिकारी म्हणून ५ तारखेला यासंदर्भात पोलिसांना पत्र दिलं. त्यानंतर आम्हाला ११ तारखेला पोलिसांचं पत्र मिळालं. त्यामध्ये तुम्ही तुमच्या बाजूने गुन्हा नोंदवा असं सांगण्यात आलं. त्यानंतर आम्ही १३ तारखेला गुन्हा दाखल केला. यामध्ये दाखल केलेल्या तक्रारीत अज्ञात व्यक्तीने मोबाईल वापरल्याचं म्हटलं आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं. तसेच ठाकरे गटाकडून येथील सीसीटीव्ही फुटेज देण्याची मागणी करण्यात येत होती. त्यावर सीसीटीव्ही फुटेज न्यायालयाच्या परवानगीनंतर दिले जातील, असं आता निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. याबरोबरच त्यांनी सांगितलं, आक्षेपानंतर मतमोजणी केंद्रावर मतांचं व्हेरिफिकेशन झालं. पोस्टल बॅलेट पेपरची फेरपडताळणी झाली. यामध्ये कोठेही रिकाऊड झालेलं नाही. ४८ चा जो लीड होता तो लीड फेरपडताळणी पूर्वीच होता. तो तसाच राहिला. मुळात मतमोजणीचा आणि अज्ञात व्यक्तीचा मोबाईलचा या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही. या दोन्ही गोष्टी एकमेकांशी कनेक्ट नाहीत, असा खुलासा निवडणूक निर्णय अधिकारी वंदना सूर्यवंशी यांनी केला आहे.

### शून्य दहशतवाद, वर्चस्वासाठी

. बैठकीला राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे, भावी लष्करप्रमुख लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्यासह वरिष्ठ सरकारी अधिकारी व गुप्तहेर संस्थांचे अधिकारी उपस्थित होते.

### सिक्कीमच्या लॅच्युन्ग व्हॅलीत..

पर्यटकांना मदत मिळवून देण्याची विनंती केली. तसेच तिथे अडकलेल्या पर्यटक सुनीता पवार यांच्याशीदेखील त्यांनी संपर्क साधून त्यांच्याशी संवाद साधला, तसेच त्यांना लागेल ती सर्व मदत करण्याचे आश्वासन देऊन धीर दिला.सिक्कीममधून मिळालेल्या माहितीनुसार राज्यातील सर्व पर्यटक हे सध्या सुरक्षित असून त्यांच्यापर्यंत सर्व मदत पोहोचवण्यात येत आहे. तसेच त्यांना तिथून सुखरूप बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरु झाले असून उद्या वायुसेनेच्या विशेष हेलिकॉप्टरच्या मदतीने सर्वांना गंगटोक येथे सुरक्षितस्थळी आणण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या मदतकार्यावर मुख्यमंत्री स्वतः लक्ष ठेवून आहेत. यांच्यासह राज्याचे मुख्य सचिव आणि मुख्यमंत्री सचिवालयातील अधिकारीदेखील या पर्यटकांशी सतत संपर्कात आहेत. त्यांच्याशिवाय अजून कुणीही सिक्कीममध्ये अडकले असल्यास त्यांनी त्वरित राज्य शासनाला संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### टेंभुर्णीजवळ अनोळखी तरुणाच्या

खुणा दिसून आल्या. मृतदेह कोणत्या तरी मोटारीतून आणून टाकल्याचा संशय आल्याने टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांनी दोन तपास पथके तयार केली. जिल्हा ग्रामीण गुन्हे शाखेकडूनही तपास केला जात होता. जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे व अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, करमाळ्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील व गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जगताप यांनीही घटनास्थळी भेट देऊन बारकाईने निरीक्षण नोंदविले होते.

गुन्ह्यात मोटारीचा वापर झाल्याचे दिसून आल्यामुळे त्या अनुषंगाने आसपासच्या रस्त्यावरील तसेच वरवडे आणि इंदापूरच्या टोलनाक्यावरील सीसीटीव्हीचे सुमारे १५ हजार फुटेज तपासण्यात आले. यात संशयित मोटारकार इंदापूरच्या सरडेवाडी टोलनाक्यावरून २६ मे रोजी सकाळी अकराच्या सुमारास जाताना दिसून आली. या मोटारीच्या दरवाजाच्या काचांवर टॉवेल तर मागील बाजूला कापड घातलेला होता. या मोटारीचा क्रमांकही सापडला. हीच मोटार टेंभुर्णीजवळ वरवडे टोलनाक्यावरून जातानाही दरवाजावरील काचा टॉवेलने आणि मागील भाग कापडाने झाकलेल्या स्थितीत होता. ही मोटार तेलंगणातील होती. पोलीस उपनिरीक्षक कुलदीप सोनटक्के यांचे पथक तेलंगणात चार दिवस तपास करीत असताना इकडे मृताच्या घेतलेल्या फिंगर प्रिंटच्या अहवालानुसार मृताचे नाव सुकुमार व्यंकटरमणा तोराडी ऊर्फ गोड्डचेरला निष्पन्न झाले. त्याची पत्, आई, बहीण व नातेवाईकांसह मित्र, शेजारच्या मंडळींचे जबाब नोंदविले असता आई व बहिणीने दिलेल्या जबाबात विसंगती दिसून आली. त्यांना पोलिसांनी विश्वासात घेऊन आणि खाक्या दाखवून तपासात घेतले असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

सुकुमार नेहमी दारू पिऊन घरात त्रास द्यायचा. त्यामुळेच त्याच्या हत्येची सुपारी दिल्याची कबुली आई व बहिणीने दिल्यानंतर हत्येची सुपारी घेणाऱ्या तिघाजणांचा शोध घेण्यात आला. सुकुमार यास मुंबईत नोकरी लावतो म्हणून मोटारीत बसवून सोलापूरमार्गे पुण्यात नेण्यात आले. तेथे चाकू खरेदी केला. नंतर पुन्हा सोलापूरच्या दिशेने येताना वाटेत टेंभुर्णीजवळ सुकुमार यास चाकूने छातीवर, गळ्यावर २५ वार करण्यात आले. नंतर मृतदेह टेंभुर्णीजवळ आणून टाकण्यात आल्याचे दिसून आले. गुन्ह्यात वापरलेल्या मोटारीसह चाकू, आरोपींच्या अंगावरील कपडे, मोबाईल, मृताचे कपडे पोलिसांनी जप्त केले आहेत.

# चंदूकाका सराफच्या पंढरपूर शाखेमध्ये रक्तदान शिबीर संपन्न




पंढरपूर/प्रतिनिधीः गेले १९८ वर्षापासून ग्राहकांच्या पसंतीस ठरलेली महाराष्ट्रातील एकमेव सुवर्ण पिढी चंदूकाका सराफ ही व्यवसायाबरोबर सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम करत असते, आज जागतिक रक्तदाता दिनानिमित्त पंढरपूर शाखेमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी पंढरपूर शाखेतील सन्माननीय ग्राहकांनी व कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून सहकार्य केले,हे रक्तदान शिबिर पंढरपूर ब्लड बँक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले, या शिबिरास प्रमुख पाहुणे म्हणून शतक वीर रक्तदाते श्री रविंद्र भिंगे सर उपस्थित होते की ज्यांनी तब्बल ११६ वेळा रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम केले. त्याचबरोबर या कार्यक्रमास डॉ. प्रसाद खाडीलकर सर( चेअरमन रक्तपेढी) डॉ. संभाजी पाचकवडे ,डॉ.राजेश फडे ,डॉ. नीरज शहा ,अरुण नागटिळक उपस्थित होते या शिबिराचे कामकाज संतोष उपाध्ये सर यांनी पाहिले तसेच या शिबिरास पंढरपूर शाखेचे व्यवस्थापक दिपक चव्हाण सर ,बंडू गोफणे सर, ऑपरेशन मॅनेजर अनिल वठारे सर फ्लोअर मॅनेजर संदीप पवार सर उपस्थित होते तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रणजित सावळे, व व्यवस्थापन प्रवीण काळे, गणेश पाटील,विनायक पवार व इतर कर्मचारी यांनी केले.

# महायुतीला तडीपार करणार म्हणणाऱ्यांना कोकणाने तडीपार केलं

## देवेंद्र फडणवीसांचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज :** लोकसभेच्या निवडणुकीनंतर आता महाराष्ट्रात विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. यामध्ये दोन शिक्षक आणि दोन पदवीधर मतदारसंघाची निवडणूक होत असून कोकण पदवीधर आणि मुंबई पदवीधर तर नाशिक शिक्षक, मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी ही निवडणूक आहे. सध्या या निवडणुकीसाठी प्रचार सुरू आहे. दरम्यान, मनसेने कोकण पदवीधर मतदारसंघामधून माघार घेत महायुतीच्या उमेदवाराला पाठिंबा दिला आहे.कोकण पदवीधर मतदारसंघामधून भारतीय जनता पार्टीचे निरंजन डावखरे हे उमेदवार आहेत. आज ठाण्यात निरंजन डावखरे यांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा पार पडली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना ठाकरे गटावर जोरदार हल्लाबोल केला. महायुतीला तडीपार करणार असं म्हणणाऱ्यांना कोकणाने तडीपार केलं, अशा शब्दांत फडणवीस यांनी ठाकरे गटावर टीका केली. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये ठाणे जिल्ह्यात आणि कोकण विभागामध्ये आपल्या महायुतीला सर्वांच्या आशीर्वादाने मोठं यश प्राप्त झालं. काही लोकांनी अशी गर्जना केली होती की, आम्ही महायुतीला तडीपार करू. पण कोकणाने त्यांना तडीपार केलं. या ठिकाणी पाच जागा या महायुतीच्या निवडून आल्या. यामध्ये एक भिवंडीची जागा आपली निवडून येवू शकली नाही. आता भिवंडीची जागा का निवडून आली नाही, याची आपल्याला कल्पना आहे. जे मुंब्रा या ठिकाणी घडलं, तेच भिवंडीमध्येही घडलं. मात्र, हे देखील सुधारण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत, असं म्हणत फडणवीस यांनी महाविकास आघाडीवर हल्लाबोल केला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# विद्यार्थी हाच शिक्षणाचा केंद्रबिंदु मानून त्याचा विकास झाला पाहिजे : सुनील पुजारी



**नळदुर्ग/दैनिक यशसिध्दि न्यूज**

ज्ञानदीप कलोपासक मंडळ संचलित दरिद्री विद्यालय आलियाबाद येथे शाळेच्या पहिल्याच दिवशी ८० टक्के उपस्थिती धरित्री च्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य देऊन स्वागत ग्राम प्रवेश फेरीतील शैक्षणिक घोषवाक्य आणि आलियाबाद नगरी दुमदुमली. निसर्गाने जसे तुमचे पावसाच्या रूपाने स्वागत केले. तसे आम्ही तुमचे पुष्प, पाठ्यपुस्तक, देऊन स्वागत करीत आहोत या शैक्षणिक साहित्याचा जास्तीत जास्त वापर करून आपल्या गुणवत्तेत वाढ करण्याचा प्रयत्न करा आज जिकडे तिकडे मुलीचा धबधबा निकालात दिसत आहे त्यासाठी मुलांनी सुद्धा अभ्यासात स्वतःला गुंतून घ्यावे. शाळेला नेहमीच उपस्थित राहावे अभ्यास करावा, शाळेतील जास्तीच्या अनुपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे प्रगती होत नसते म्हणून आजचे शिक्षण हे विद्यार्थी केंद्र शिक्षण असून विद्यार्थी हाच शिक्षणाचा केंद्रबिंदू मानून त्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार उपक्रम राबवले जातात दहावी परीक्षेत विद्यालयाने उज्वल या संपादन केले आहे. शाळेचे वातावरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास पोषक आहे. असे विद्यालयाचे मुख्याध्यापक महाराष्ट्र शासन राज्य पुरस्कार प्राप्त सुनील पुजारी यांनी सांगितले आणि नवीन शैक्षणिक वर्षाच्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना शुभेच्छा ही दिल्या. उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपल्यानंतर १५ जून पासून ग्रामीण भागात नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाली. नवगतांचे स्वागत नवगतांचे स्वागत व प्रवेशोत्सव कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक विद्यालयाचे सहशिक्षक अण्णाप्पा सातलगावकर यांनी केले. पालकांनी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थी व विद्यार्थिनींचे गुलाब फूल देऊन स्वागत करण्यात आले आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

इयत्ता पाचवी ला प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक स्वागत सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी पुष्पवृष्टी आणि टाळ्याच्या गजरात केले. शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत गोड खीर विद्यार्थ्यांना देऊन पहिला दिवस गोड करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख युवराज होळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन शुभांगी कारंजे यांनी मानले. यावेळी कार्यक्रम यशस्वीतेसाठी रमेश चव्हाण, गोरख जगताप, जगदेवी शंकर शेट्टी, विठ्ठल पाटील शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मातेस भाविकाकडून ०४ लाख ७७ हजार किंमतीचे चांदी वस्तू अर्पण

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मौजे हिंगणी तालुका करमाळा येथील भाविक सौ. कमल मोहन बाबर यांनी श्री विठ्ठल रूक्मिणीमातेस ५ किलो ४२५ ग्रॅम वजनाच्या चांदी वस्तू अर्पण केले आहेत. त्याची किंमत रू.४७७०००/- इतकी आहे. यावेळी मंदिर समितीच्या वतीने सौ.बाबर यांचा सत्कार मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्र्वर देशमुख जळगावकर व व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब, विभाग प्रमुख ज्ञानेश्र्वर कुलकर्णी उपस्थित होते.



सदरची देणगी कै. कानून मोहन बाबर यांच्या स्मरणार्थ मिळाली असून, या चांदी वस्तूचे वर्णन गरुड व हनुमंत पताका आहे. विविध सण-उत्सव व यात्रा कालावधीत श्रींच्या मिरवणुकी वेळी या चांदीच्या पताकाचा वापर करण्यात येणार आहे. सौ. बाबर यांच्या मुलाचे नुकतेच अपघाती निधन झाले आहे. आपल्या मुलाच्या संपत्तीतील काही हिस्स्यातून व मुलाची आठवण राहावी म्हणून पांडुरंग चरणी आईने दान दिले आहे. त्या श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या निस्सिम भक्त असून मागील अनेक वर्षापासून आषाढी व कार्तिकी वारी करीत आहेत.

# ईटकुर येथे आमदार, सीईओ,शिक्षणाधिकारी, व पहिलीतील नवीन प्रवेश केलेल्या मुलांची सजवलेल्या बैलगाडीतून मिरवणूक

**ईटकुर/सुधाकर रणदिवे**

कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ईटकुर येथील इयत्ता पहिली मध्ये नवीन प्रवेश केलेल्या मुलांची बैलगाडीतून काढली मिरवणूक शाळेत पहिल्या दिवशी विविध उपक्रम घेण्यात आले या कार्यक्रमासाठी आमदार माननीय श्री कैलास दादा पाटील धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री मैनाक घोष, शिक्षण अधिकारी अशोक पाटील, व इयत्ता पहिलीतील वर्गात प्रवेश घेणाऱ्या मुलांची सजवलेल्या बैलगाडीतून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत लेझीम, टिपऱ्या, वारकरी मंडळी, विविध वेशभूषेत विद्यार्थी, सहभागी झाले होते. या कार्यक्रमात विविध स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या व इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर जिल्हा परिषदेने नवीन वाचनालय उघडलेला आहे, त्या वाचनालयाची पाहणी करण्यात आली. त्यानंतर वाचनालयाला









काही पुस्तके भेट देण्याचे सी ई ओ आणि आमदार यांनी आश्र्वासन दिले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हरिदास पावले, सचिन गंभीरे,लक्ष्मण आडसूळ, प्रशालेचे मुख्याध्यापक चंद्रकांत शिंदे,प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शारदा मुंडे, शाळेतील सर्व शिक्षक, व ईतर स्टाफ यांनी खूप परिश्रम घेतले. यावेळी गावातील सर्व शिक्षक प्रेमी व पालक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोपगाव येथे इयत्ता पहिलीतील नवीन विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत



**पुरंदर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मौजे बोपगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ग्रामपंचायत बोपगाव यांच्या वतीने शाळेमध्ये नवीन दाखल झालेल्या इयत्ता पहिली मधील नवीन बाल विद्यार्थ्यांचे मिरवणूक काढून जंगी स्वागत करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या वतीने पाठ्यपुस्तके,ग्रामपंचायत बोपगाव च्या वतीने शालेय साहित्य,तसेच श्री योगेश नाना फडतरे :माजी स्वीकृत सदस्य जि प पुणे मित्र मंडळ च्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना खाऊ व शालेय साहित्य वाटप करून गुलाब पुष्प देऊन जंगी स्वागत करण्यात आले

यावेळी सरपंच सौ प्रियंका फडतरे ग्रामसेविका सौ राखी ढगारे,श्री सोनबा सर फडतरे :अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती,भाऊसाहेब गेनबा फडतरे, मा चेअरमन विजय लक्ष्मण फडतरे,भाऊसाहेब किसन फडतरे, श्री तुकाराम शेठ फडतरे,भाऊसाहेब तुकाराम फडतरे,मस्कुशेठ बाळू फडतरे, प्रमोद आप्पा फडतरे,गणेश फडतरे, महिला पालक भगिनी, विनायक गायकवाड पोलीस पाटील,बोपगाव जि प शाळा मुख्याध्यापक: सौ कानडे मॅडम,सौ बोरकरमॅडम,सौ पवार मॅडम,सौ शिंदे मॅडम या सर्वांनी नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# जिल्हा परिषद विद्या मंदिर टाकळीवाडी गुणवत्तापूर्वक शाळा

**पत्रकार नामदेव निर्मळे**

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जिल्हा परिषद शाळा कुमार विद्यामंदिर ही आदर्श शाळा म्हणून निवड झालेली आहे. तालुक्यातील शैक्षणिक व क्रीडाविभागातील एक आदर्श शाळा . तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय, प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये, सांस्कृतिक, क्रीडा, स्पर्धेमध्ये या शाळेतील विद्यार्थी अव्वल ठरलेले आहेत. आदर्श शिक्षक, आदर्श विद्यार्थी, हा ठेवा शाळेने जपलेला आहे. एक आदर्श शिक्षक टीम, शाळा व्यवस्थापन समिती, सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य ग्रामपंचायत यांचे शाळेवरती पुरेपूर लक्ष असते. मोठी इमारत आणि शाळेचे मोठे ग्राउंड, प्रयोगशाळा, शैक्षणिक साधने या सर्व सुविधा शाळेमध्ये आहेत. लवकरच रिक्त जागेवर बदली व भरतीने भविष्यातील




शिक्षणाचा येणारा खर्च भरपूर आहे, ज्या शाळेत त्यांचे आजोबा, पप्पा शिकले त्या शाळेत त्याला अभिमानाने शिकू द्या.विध्यार्थ्यांना लावी लळा, जिल्हा परिषदेची शाळा, कोणतीही फी नाही. पाठ्यपुस्तके, गणवेश मोफत. विध्यार्थी विकासाची हमी.

# अनंत चैतन्य प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूर येथे प्रवेशोत्सव उत्साहात

**अक्कलकोट /दैनिक यशसिध्दि न्यूज**

१५ जुन रोजी -महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय तसेच सेमी इंग्रजी प्राथमिक विद्यालय हन्नूर येथे प्रवेशोत्सव उत्साही वातावरणात पार पडला. सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षातील शाळेचा पहिला दिवस असल्याने नवा गणवेश, नवा वर्ग, नव- नवीन मित्र- मैत्रिणी, नवे शिक्षक याविषयी विद्यार्थ्यांमध्ये असलेली उत्सुकता स्पष्टपणे जाणवत होती.व सुंदर रांगोळी, फुलांचे तोरण, फुग्यांच्या व वेगवेगळया आकर्षक सजावटीमुळे वातावरण प्रसन्न व आनंदमय बनले होते. सर्वप्रथम हन्नूर गावचे उपसरपंच व युवा नेते मा. सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या शुभहस्ते विद्या देवी सरस्वती व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. आदरणीय पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यानंतर प्रशालेत दीर्घकाळ सेवा करून शासकीय नियत वयोमानानुसार मुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त झाल्याने श्री. विलास बिराजदार सर व विज्ञान विषय शिक्षक श्री.विश्र्वनाथ चव्हाण सर यांचा सेवापुर्ती निमित्त हन्नूर गावचे उपसरपंच व युवा नेते मा.श्री. सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते फेटा शाल, हार, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आले व सेवापुर्ती नंतरच्या आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते नवोगत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन, औक्षण करून, मिठाई भरवून स्वागत करण्यात आले व मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांनी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. पंचप्पा कल्याणशेट्टी सरांच्या स्मृतिना वंदन करून संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार मा. श्री.सचिनदादा कल्याणशेट्टी, गुरुवर्य व जेष्ठ संचालक मा. श्री.मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ सन्माननिय श्री.सिध्देश्र्वर कल्याणशेट्टी, संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी



यांचे मुख्याध्यापक पदी नियुक्त करून सेवेची संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल संस्थेचे आभार मानले व शालेय शिस्तीसह गुणवत्ता वाढीसाठी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. तसेच विद्यार्थ्यांनी नियमित शाळेला उपस्थित राहून शाळेतील सर्व उपक्रमात सहभागी होऊन शालेय नियमांचे पालन करून प्रगती साधावी असे आवाहन केले. व संचालक श्री.मल्लिकार्जून मसुती, सीईओ सौ. रूपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ.पुनम कोकळगी यांनी कार्यक्रमाच्या उत्तम नियोजनाबद्दल संयोजकांचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन सौ.मल्लम्मा चप्पळगाव यांनी तर आभार सौ.स्वप्नाली जमदाडे यांनी मानले. यावेळी प्रा.रविंद्र कालीबत्ते, प्रा.रमेश शिंदे, हन्नूर प्राथमिक सेमी विभाग प्रमुख शशीकांत अंकलगे, ज्ञानदेव शिंदे, धनंजय जोजन आदी शिक्षक वृंद , शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी- विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष वर्धापन दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**बुलढाणा/ राहुल साबळे**

मा आमदार डॉ राजेंद्रजी शिंगणे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त वर्ग १० वी १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तथा शासकीय नोकरीसाठी निवड या विद्यार्थ्यांचा सत्कार तथा अभिनंदन सोहळा समारंभ आज दि १६ जुन २०२४ आर्या लॉनस दे राजा येथे कार्यक्रमांचे सत्कारमूर्ती मा डॉ राजेंद्रजी शिंगणे साहेब, तसेच मा ॲड नाझेर काझी साहेब ( जिल्हा अध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला त्या अनुषंगाने श्री शिवाजी विद्यालय दे मही येथील विद्यार्थ्यांनी कु किरण शिवाजी प-हाड या विद्यार्थ्यांनीने शैसत्र सन २०२३-२४ मध्ये वर्ग १० मध्ये ९०.६० गुण मिळवुन घवघवीत यश प्राप्त केल्याबद्दल तीचा उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले त्या प्रसंगी उपस्थित मा आ डॉ राजेंद्रजी शिंगणे साहेब, मा ॲड नाझेर काझी साहेब, मा डोंगरजाळ मॅडम, तहसिलदार मॅडम दे काही उपाध्यक्ष राष्ट्रवादी शिक्षक संघटना, ठाणेदार महले साहेब, संचालक धुळे साहैब,जी गटविकास अधिकारी माहुरे साहेब,सर उपविभागीय पोलिस अधिकारी कदम मॅडम तथा इतर शासकीय अधिकारी व पदाधिकारी.उपस्थीत होते



# आषाढी एकादशी सोहळा भव्य रूपाने साजरा होण्यासाठी सर्व भौतिक बाबींची पूर्तता होणार : आ.समाधान आवताडे

## आ.समाधान आवताडे यांच्या मागणीनुसार वारी अनुदान पाच कोटी वरून दहा कोटी होणार

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

वर्षभरामध्ये विविध वारी सोहळ्याच्या निमित्ताने व इतर कालावधीत श्री.विठ्ठल-रखुमाई दर्शनसाठी हजारो भाविक पंढरपूर नगरीमध्ये दाखल होत असतात. भगवंत पांडुरंगाच्या वारी सोहळ्यामध्ये सर्वात मोठा आणि अभूतपूर्व सोहळा म्हणजे आषाढी एकादशी वारी होय. या वर्षीचा हा सोहळा काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे या वारीनिमित्त पंढरपूर शहरांमध्ये येणाऱ्या वारकरी भक्तांसाठी सर्व भौतिक सोयी-सुविधा बाबींची नीटनेटकेपणाने व व्यवस्थित पूर्तता होणार असल्याची माहिती मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी मुंबई येथे पत्रकारांशी बोलताना दिली आहे.



आषाढी एकादशी सोहळा भव्य रूपाने साजरा करण्याच्या अनुषंगाने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये मुंबई येथे या सोहळ्यानिमित्त केलेल्या नियोजनाची आढावा बैठक संपन्न झाली. सदर बैठकीनंतर आमदार आवताडे हे पत्रकारांशी बोलत होते. त्यांनी सांगितले की, वारी परंपरेतील अतिशय महत्त्वपूर्ण आणि अविभाज्य घटक म्हणजे संपूर्ण देशातून पंढरपूर शहरांमध्ये दाखल होणाऱ्या विविध दिंड्या उत्सव आहे. आषाढी एकादशी निमित्त जवळपास १५०० हून अधिक दिंड्या पंढरीमध्ये विठुरायाच्या दर्शनासाठी दाखल होतात. या दिंड्या समवेत आलेल्या वारकरी भाविकांना व इतर वारकऱ्यांना चांगल्या पद्धतीने सुविधा मिळाव्यात यासाठी प्रशासनामार्फत विविध बाबींची पूर्तता करण्याचे काम आघाडीवर आहे. त्याचबरोबर यात्रा अनुदान अनुषंगाने वारी सोहळ्यासाठी अनुदान वाढवून मिळण्यासाठी आ आवताडे यांनी हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणी केली असता त्यास शासन पातळीवर निर्णय होऊन पूर्वी ५ कोटी असणारे अनुदान आता १० कोटी एवढे झाले आहे.

तसेच सर्व दिंड्यांना प्रत्येकी वीस हजार रुपये देण्याचेही मंत्री महोदय यांनी जाहीर केले आहे. तसेच महाराष्ट्रातील सर्वात मोठा कत्तलखाना दौंड येथे करण्याचे नियोजित असताना पालखी विश्र्वस्तांनी याला कडून विरोध केला असता मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या कत्तलखाना रद्द करण्याचे सक्त आदेश दिले आहेत.

तत्पूर्वी सकाळी पुणे येथे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा अनुषंगाने विभागीय आयुक्त पुणे येथे आढावा बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीसाठी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी उपस्थित राहून पर्यटन विकास संदर्भात मतदारसंघातील विविध मागण्या मंत्री महोदय यांच्यासमोर मांडल्या.

भारताची दक्षिण काशी म्हणून परिचित असलेल्या पंढरपूर येथील श्री.विठ्ठल-रखुमाईच्या दर्शनासाठी वारीच्या रूपाने अनेक वारकरी भक्त पंढरपूर नगरीमध्ये येतात. परंतु सदरदरम्यान ये-जा करत असताना या भाविकांना पंढरपूर येथील बस स्थानक जागा अपुरी पडत आहे. त्यामुळे पंढरपूर बसस्थानकाचे विस्तारीकरण करून करून द्यावे. पवित्र चंद्रभागा नदी प्रदूषण मुक्त करण्यासाठी स्वच्छतेच्या दिशेने योग्य ती कार्यवाही करून चंद्रभागा नदीचे पवित्र जतन करण्यात यावे. त्याचबरोबर चंद्रभागा नदीमध्ये भक्तीस्नान करणाऱ्या महिला वारकरी भगिनींना चंद्रभागा आवारामध्ये स्नानगृहे उभारण्यात यावीत व पालखी मार्गावर वृक्षारोपण करणे अशा विविध मागण्या आमदार आवताडे यांनी या बैठकीवेळी केल्या.

या बैठकीसाठी आमदार संजय मामा शिंदे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, शासकीय विभागांचे सचिव, अप्पर सचिव, पोलीस प्रशासनातील अधिकारी, इतर मान्यवर आणि विविध खात्यांचे प्रशासकीय अधिकारी पदाधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांचे हात बळकट करण्यासाठी युवकांनी परिश्रम घ्यावे: जिल्हाध्यक्ष संतोष पवार

## राष्ट्रवादी युवक प्रमुखांची आढावा बैठक संपन्न

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज:**

दहा जून वर्धापन दिनानिमित्त मुंबई येथे झालेल्या मेळाव्यात राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे साहेब यांनी सर्व जिल्हाध्यक्ष कार्याध्यक्ष यांनी सर्व फ्रंटल सेल यांनी सोबत घेऊन पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवण्यावर भर द्यावा अशी सूचना देण्यात आली प्रत्येक फ्रंटला सेल अध्यक्ष कार्याध्यक्ष यांनी पक्ष कार्यासाठी वेळ द्यावा असा आदेश दिला आहे त्या अनुषंगाने आज राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक राष्ट्रवादी भवन येथे आयोजित करण्यात आली




या बैठकीत राष्ट्रवादीच्या नेत्या राज्यसभेवर बिनविरोध खासदार पदी सुनीत्रा वहिनी पवार यांची निवड निश्र्चित झालेले अभिनंदन दादा मंजूर राष्ट्रवादी युवक राष्ट्रीय अध्यक्षपदी धीरज शर्मा यांची निवड करण्यात आली त्यांच्या अभिनंदनचा ठराव मंजूर नुकतीच लोकसभा निवडणूक होऊन गेली आता विधानसभा आणि महापालिका निवडणुका जवळ येत असून राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांची हात बळकट करण्यासाठी पक्ष संघटना मजबूत करण्यात सर्व युवक पदाधिकाऱ्यांचे सहभाग घ्यावा रात्रीच्या दिवस करून पक्ष वाढीसाठी प्रयत्न करावेत असे आव्हान जिल्हाध्यक्ष संतोष पवार राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांना शहर मध्य विधानसभेची जागा महायुती मधून राष्ट्रवादीसाठी सोडवून घेण्याची विनंती केली असून त्यासाठी विधानसभेच्या सर्व भूत नेमण्यात युवकांनी पुढाकार घ्यावा असे प्रतिपादन कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी केली

युवक राष्ट्रवादी सोलापूर शहरातील सर्व भागात चांगल्या पद्धतीने काम करत असून येणाऱ्या पंधरा दिवसात सर्व शहर कार्यकारिणीतील पदाधिकारी नेमण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल पक्ष संघटना मजबूत करून अजितदादांचे हात बळकट करण्यासाठी प्रत्येक युवक कष्ट घेईल युवक अध्यक्ष सुभाष कदम बैठकीची आयोजन करण्याचे उद्दिष्ट कार्याध्यक्ष तुषार झक्का यांनी मांडले

ज्येष्ठ नेते हेमंत दादा चौधरी आनंद मुस्तारे यांनी मार्गदर्शन केले प्रदेश सरचिटणीस सचिन देवकते समन्वयक दत्तात्रेय बडगंची महेश कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या युवक आढावा बैठकीय जिल्हाध्यक्ष संतोष पवार कारध्यक्ष जुबेर बागवान जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले युवक अध्यक्ष सुहास कदम युवा कार्याध्यक्ष तुषार झक्कास ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी आनंद मुस्तारे चेतन गायकवाड सनी देवकते दत्तात्रेय बडगंजी महेश कुलकर्णी ओंकार हजारे अक्षय पवार कृष्णकांत झक्कास सरफराज बागवान समाज बेणुगोपाल बडगी प्रकाश गुंडाला गुप्त गार बागवान हिसाब बागवान आधी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुलींची शाळा दुधनी येथे प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

**दुधानी /दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुलींची शाळा दुधनी येथे शैक्षणिक वर्ष २०२४ २५ चे शाळेचे प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न झाला. इयत्ता पहिली प्रवेश घेतलेला सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ फुगे चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री जगदीश माशाळ हे होते. कार्यक्रमाच्या उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सौ सुहासिनी गद्दी यांनी केले.



कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रथम उपस्थित मान्यवर यांचे हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमेचे फोटो पूजन करण्यात आले. या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सौ सुहासिनी गद्दी , उपअध्यक्ष श्री श्रीमंतप्पा परमशेट्टी,सदस्या सौ मल्लम्मा कल्लूर,सौ लक्ष्मी काळे,सौ प्रेमा पादी तसेच गावातील प्रतिष्ठित व्यापारी श्री प्रशांत पादी आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्री संतोष जोगदे यांनी केले.चालू शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिलीचे सेमी इंग्लिश क्लासेस सुरू करण्यात येत आहे अशी माहिती मुख्याध्यापकांनी दिली.या प्रसंगी सर्व मुलांना उपस्थित मान्यवरांचे हस्ते पाठ्य पुस्तक वाटप करण्यात आले. सौ सुहासिनी गद्दी यांचे हस्ते सर्व मुलांना शिरा वाटप करण्यात आले. शालेय कामी सर्व पालकांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा श्री परमेश्र्वर वागोली यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री सिद्धाराम चौधरी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक श्री शिवचलप्पा बाबा, शिक्षक वृंद श्री चिदानंद मानकर, सौ विद्या चिंचुरे, श्री सिद्धू राठोड, श्री संतोष जोगदे ,श्री सिद्धाराम चौधरी सौ सुजाता हिरोळी मॅडम आदी परिश्रम घेतले.

# हत्तीकणबस केंद्र शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात साजरा




**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा हत्तीकणबस ता. अक्कलकोट येथे इयत्ता १ली वर्गात दाखल होणाऱ्या बालकांचा प्रवेशोत्साव उत्साहात साजरा करण्यात आला.

मार्गदर्शक या नात्याने गटशिक्षणाधिकारी श्री प्रशांत अरबाळे आणि हत्तीकणबस केंद्राचे केन्द्र प्रमुख श्री. सुरेश शटगार उपस्थित होते. कार्यक्रमाला मठाधिपती श्री. प्रभूषांत महास्वामीजी यांचे दिव्य सानिध्य लाभले.श्री. प्रशांत अरबाळे यांनी विध्यार्थी पालक आणि शिक्षक यांना मोलाचे मार्गदर्शन केले. बौद्धिक, भावनिक आणि शारिरीक विकासाबरोबर विद्यार्थ्यांच्या चारित्र्य विकासाला प्राधान्य द्यावे असे आवाहन श्री.अरबाळे यांनी केले. मुख्याध्यापक श्री. इस्माईल मुर्डी सर नीवृत्त झालेले असतानाही आज शाळेत उपस्थिती राहून प्रवेशोत्सव कार्यक्रमात मोलाचे योगदान देत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शाळा, विद्यार्थी,पालक यांच्याशी असलेले जिव्हाळ्याचे नाते कायम राहील ही भावना त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्ती केली. केंद्रप्रमुख श्री सुरेश शटगार यांनी पालकांना उद्बोधन केले. जिल्हा परिषदेच्या शाळा उत्कृष्ठ असून आपल्या पाल्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत आहे यासाठी आपल्या मुलांना जिल्हा परिषदेच्या शाळेतच पाठवावे असे त्यांनी आवाहन केले.या कार्यक्रमाला सरपंच श्री. श्रीशैल माळी , उपसरपंच श्री. म्हेत्रे , शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. देवेंद्र बिराजदार उपाध्यक्ष श्री. पांचाप्पा घोडके, श्री. गुरू अण्णा उन्नद, पोलीस पाटील श्रीम. महादेवी ताई पाटील, ज्योती ताई बिराजदार, श्री . संजय हिरापुरे, श्री.धुळाप्पा बिराजदार, श्री.शिवराया हिरापूरे व सर्व सदस्य, मोठ्या संख्येने माता पालक उपस्थित होते.

शाळेतील शिक्षक भगिनी श्रीम. उषा गायकवाड मॅडम यांनी आपल्या मुलाच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पहिलीच्या विद्यार्थ्यांना स्कूल बॅग आणि पाटी पेन्सिल हे साहित्य भेट देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.माजी तंटामुक्त अध्यक्ष श्री बसवराज माणिक बिराजदार यांनी आपल्या नातवाच्या वाढदिवसानिमित्त ५०००/रुपये शाळेला देणगी स्वरुपात भेट दिली. नव्याने दाखल होणाऱ्या मुलांचे औक्षण करून गुलाबपुष्प देऊन ट्रॅक्टरमध्ये बसवून त्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. गावातील अनेक पालक उत्साहाने सहभागी झाले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांनी परिश्रम घेतले.

# मुख्य सचिव डॉ. नितीन करिर यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

**पंढरपूर /दैनिक यशसिध्दी न्यूज**

राज्याचे मुख्य सचिव ड्रॉ नितीन करीर यांनी आज श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती देऊन यथोचित सन्मान करण्यात आला



यावेळी महसूल विभागाची अफर मुख्य सचिव राजेश कुमार मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर उपविभागीय अधिकारी सचिन इथापे उपविभागीय पोलीस अधिकारी ड्रॉ अर्जुन भोसले तहसीलदार सचिन लंगोटे गटविकास अधिकारी सुशील संसारे मंदिर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड नायब तहसीलदार मनोज चौधरी यांच्यासह मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन व जीर्णोद्धार कामे पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून सदर कामाची पाहणी राज्याचे मुख्य सचिव ड्रॉ नितीन करीर यांनी केली यावेळी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सुरू असलेल्या व करण्यात येणाऱ्या कामाची माहिती यावेळी त्यांना दिली